**जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव**

**पारगमन शुल्क संकलासाठी (Escort Fee) अभिकर्ता (Agent) नियुक्तीसाठीची फेर निविदा सुचना**

आयुक्त, जळगाव शहर महानगरपालिका मार्फत पारगमन शुल्क वसुलीसाठी तीन लिफाफा पध्दतीने निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामाची विस्तृत निविदा सुचना व निविदा कार्यक्रम महानगरपालिकेच्या www.jcmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे. इच्छुक व्यक्तींनी सदरची माहिती संकेतस्थळावरून घ्यावी व अधिक माहितीसाठी महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालय १७ मजली प्रशासकीय इमारत, नेहरू चौक, महात्मा गांधी रोड, जळगाव ४२५००१ येथे किंवा ०२५७-२२२२२६१-६५ (Ext -१२३) या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

**आयुक्त,**
**जळगाव शहर महानगरपालिका,जळगाव**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**

**पारगमन शुल्क (एस्कॉर्ट) संकलनासाठी अभिकर्ता (एजंट) नियुक्त करण्यासाठी देकार (ऑफर) मागविण्याबाबत निविदा सुचना**

**फेर निविदा सुचना**

जळगांव शहर महानगरपालिका, पारगमन शुल्क (एस्कॉर्ट) सकंलनसाठी अभिकर्ता नेमणूक करण्याकरीता विहीत नमून्यात मोहरबंद देकार (निविदा) मागवित आहे .

१) कोरे देकार नमुने व निविदा संच रक्कम रू. १०,०००/- (अक्षरी रू.दहा हजार मात्र) रोख भरणा केलेवर, आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका कार्यालय, जळगांव यांचे कार्यालयात दि. १६/०७/२०१२ पासून दि. २२/०७/२०१२ पावेतो कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत व दि२३/०७/२०१२ रोजी दु.१ वाजे पर्यंत मिळविता येतील.

२) **इसाऱ्याची अनामत रक्कम (१%) :** इसाऱ्याची रक्कम रू. १०,९५,७५०/- (अक्षरी रू.दहा लक्ष पंच्यानऊ हजार सातशे पन्नास रू मात्र) कॉल डिपॉझिट ही राष्ट्रीयकृत बँक किंवा शेडयुल बँकेची डी.डी./बँकर चेक/पे-ऑर्डरचे स्वरूपात असावी. सदरची कॉल डिपॉझिट लिफाफा क्र. १ मध्ये असणे आवश्यक राहील. डिमांड ड्रॉफ्ट आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव यांचे नावे असावा.

३) **सुरक्षा अनामत (१०%) :** रक्कम रू. १,०९,५७,५००/-(अक्षरी रू. एक कोटी नऊ लक्ष सत्तावन हजार पाचशे मात्र) सुरक्षा अनामत यशस्वी अभिकर्त्यास राष्ट्रीयकृत बँक किंवा शेड्युल बँकेच्या हमीपत्राच्या स्वरूपात कार्यादेश दिल्याच्या दिनांकापासुन ७ दिवसांचे आत म.न.पा.कडे जमा करावी लागेल.

४) **पारगमन शुल्क (एस्कॉर्ट) संकलन कालावधी :** दि.०१/०८/२०१२ ते दि.३१/३/२०१३

५) **पारगमन शुल्क (एस्कॉर्ट) दर :** महानगरपालिकेने निश्चित केलेल्या दरानेच अभिकर्त्यास पारगमन शुल्क (एस्कॉर्ट) संकलन करावे लागेल. (सध्याचा पारगमन शुल्क दर रू. १५०/- प्रतिवाहन आहे.)

६) **किमान देकार रक्कम आणि अदायगीची पध्दत :-** किमान देकार रक्कम रू. १०,९५,७५,०००/- (अक्षरी रू.दहा कोटी पंच्यानऊ लक्ष पंच्याहत्तर हजार मात्र)पेक्षा कमी असलेली कोणतीही निविदा स्विकारली जाणार नाही. अभिकर्त्यास मंजुर वार्षिक देकाराच्या रकमेचे १६ समान हप्त्यात प्रत्येक पंधरवाड्यात भरणा करावा लागेल.

७) निविदेचा लखोटा सिलबंद असणे आवश्यक आहे. त्यावर "जळगांव शहर महानगरपालिकेच्या पारगमन शुल्क संकलनासाठी अभिकर्त्याची नेमणुकीबाबत निविदा" असे ठळक अक्षरात नमूद करावे. तसेच निविदा लखोट्यावर बयाणा (इसारा रक्कम) ठरलेल्या रक्कमेच्या डिमांड ड्राफ्टची छायांकित प्रत जोडणे आवश्यक असून मुळ डिमांड ड्राफ्ट प्रत लिफाफा क्रमाक एक या लखोट्यामध्ये असणे आवश्यक आहे. अन्यथा निविदा विचारात घेतली जाणार नाही. निविदा तीन लिफाफा पध्दतीने स्विकारली जाईल. पहिल्या लिफाफ्यात इसारा रकमेचा मुळ डीमांड ड्राफ्ट राहील. दुसऱ्या लिफाफ्यात पात्रतेबाबत कागदपत्रे राहतील.तीसऱ्या लीफाफ्यात निविदा ऑफर राहील. दुसऱ्या लिफाफ्यातील पात्रतेबाबत कागदपत्र पूर्ण असल्यावरच तीसरा लिफाफा उघडण्यात येईल.

८) **देकार सादर करणे व उघडण्याची वेळ :-** विहीत नमुन्यातील मोहोरबंद देकार दि. २३/०७/२०१२ रोजी दुपारी ४:०० पर्यंत उपायुक्त, जळगांव शहर महानगरपालिका कार्यालयात स्विकारले जातील व शक्य झाल्यास त्याच दिवशी सायंकाळी ५:०० वा. निविदाकार अगर त्यांचे प्रतिनिधी जे कोणी हजर असतील त्यांचे समक्ष उघडणेत येतील.

९) पात्रते संबंधी व इतर सर्व अटी शर्ती निविदेमध्ये सविस्तर नमुद आहे.

**टिप :-** प्राप्त देकार स्विकृत अथवा अस्विकृत करण्याचा अधिकार महानगरपालिकेस असेल.

**ठिकाण : जळगांव**
**दिनांक :**१२/०७/२०१२

**आयुक्त,**
**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**